# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## जाहीर आवाहन

### शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ या कालावधीचा नवीन महाविद्यालय, विद्याशाखेचा पंचवार्षिक बृहत आराखडा तयार करण्याबाबत

## Preparation of Perspective Plan for A.Y. 2024-25 to 2028-29

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ कलम १०७ मधील तरतुद तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी निर्देशित केल्यानुसार शिवाजी विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२३-२४ ते २०२८-२९ या कालावधीचा पंचवार्षिक बृहत आराखडा तयार करणेचे काम सध्या सुरु आहे. विद्यापीठ परिक्षेत्रातील विविध परिसरांची भौगोलिक, सामाजिक तसेच आर्थिक निकड जाणून घेऊन संबंधीत ठिकाणाच्या आवश्यकतेनुसार त्या-त्या ठिकाणी नवे विषय, अभ्यासक्रम, महाविद्यालय, मान्यताप्राप्त संस्था, संशोधन केंद्र, सॅटेलाईट केंद्र यांच्यासाठी बृहत आराखड्यामध्ये तरतुद करणे जरुरीचे आहे. याकरीता या विशिष्ट ठिकाणांची / परीसराची माहिती करुन घेणेकरीता वरील अधिनियमातील तरतुदीनुसार शास्त्रोक्त सर्वेक्षणाचा कार्यक्रम विद्यापीठाने सुरु केला आहे. या सर्वेक्षणामध्ये विद्यापीठातील सर्व अधिविभाग तसेच संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, प्रशासकीय सेवक, प्राचार्य, माजी विद्यार्थी तसेच शैक्षणिक संस्थाचालक, विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळावरील सदस्य, प्रख्यात शिक्षणतज्ञ, बिगर शासकीय संस्थांचे पदाधिकारी / समाजसेवक, उद्योजक / व्यावसायिक, विद्यार्थ्यांचे पालक, विविध खाजगी आस्थापनांवरील व्यवस्थापक / संचालक इ. विविध बारा घटकांकडून नव्याने बृहत आराखडा सुरु करावायाच्या शैक्षणिक बाबींविषयी माहिती जाणून घेतली जाणार आहे.

सदरचे सर्वेक्षण करण्यासाठी विद्यापीठाव्दारे Google Form विकसित केला आहे. तसेच विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर मुख्य पृष्ठावर http://www.unishivaji.ac.in/bcud/Perspective-Plan-2024-2028 या नावाने वेब लिंक उपलब्ध केली आहे. सदरच्या Google Form वर सर्व बारा घटकांसाठी स्वतंत्रपणे बारा विविध घटकनिहाय प्रश्नावल्या उपलब्ध केल्या आहेत. तसेच यामधील प्रत्येक प्रश्नाकरीता बहुपर्यायी उत्तरे देखील उपलब्ध आहेत.

आपल्या विद्यापीठाच्या पंचवार्षिक बृहत आराखड्यामध्ये विद्यापीठ परिक्षेत्रामध्ये आवश्यक त्या ठिकाणी नवीन विषय, अभ्यासक्रम, नवीन महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था, संशोधन केंद्रे तसेच सॅटेलाईट सेंटर यांचा अंतर्भाव करुन सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्याकरीता जास्तीत जास्त चांगल्या पध्दतीच्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न सुरु आहे.

याअनुषंगाने आपणा सर्वांना नम्र विनंती आहे की, आपण वर उल्लेख केल्यानुसार Google Form अथवा विद्यापीठ संकेतस्थळावरील वेबलिंकव्दारे आपणाकरीता लागू असणाऱ्या प्रश्नावलीमध्ये योग्य ती माहिती भरुन या सर्वेक्षणामध्ये आपला यशस्वी सहभाग नोंदवावा. सदरची सर्वेक्षण प्रक्रीया ही गुरुवार, दि.१६.०३.२०२३ ते २५.०३.२०२३ या कालावधीमध्ये गुगल फॉर्मवर उपलब्ध आहे.

कळावे,

Sd/-
**डॉ. विलास एन. शिंदे**
**प्र.कुलसचिव**

**संदर्भ क्र. शिवाजी वि/संलग्नता/टी-२/412**
**दि.१६.०३.२०२३**